| | |
|---|---|
| | प्रकरण दाखल तारीख : ३०/०१/२०२४<br>प्रकरण फैल तारीख : ३०/०१/२०२४<br>प्रकरण निकाल तारीख : ०९/०३/२०२६<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>०२ ०१ ०९ |

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि.रायगड यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी एस.के.शेख यांचे समक्ष)

**न्यायनिर्णय**

**(निशाणी क्रमांक १६/ब)**

(**नियमीत फौजदारी प्रकरण क्र.०३/२०२४**)

श्रीवर्धन पोलीस ठाणे प्रथम खबरी अहवाल क्र.१२४/२०२३

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन**<br>तर्फे श्रीवर्धन पोलीस ठाणे<br>(सहा. सरकारी अभियोक्ता श्री. मुकेश पाटील) |
| **आरोपी** | **राहुल अरुण खैरे**, वय : ३३ वर्ष,<br>रा. मारळ, श्रीवर्धन, रायगड<br>(वकील श्री. स्वानंद दातार) |

| | |
|---|---|
| घटना तारीख | ०२/०९/२०२३ ते ०५/०९/२०२३ |
| पहिली खबर दिनांक | १५/१०/२०२३ |
| दोषारोप दाखल दिनांक | ३०/०१/२०२४ |
| आरोप निश्चितीचा दिनांक | ०२/०९/२०२४ |
| संपरीक्षा सुरु झाल्याचे दिनांक | २३/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय | ०९/०३/२०२६ |
| अंतिम आदेश | आरोपीस निर्दोष करण्यात येते. |

## आरोपीची माहिती

| अ.क्र. | आरोपीचे नांव | आरोपीच्या अटकेचा दिनांक | जमानतीवर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष अथवा शिक्षा | शिक्षा | फौ.प्र.सं.चे कलम ४२८ अन्वये कारागृहात व्यतित केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राहुल अरुण खैरे | २४/११/२३ | २४/११/२३ | ४५४, ४५७, ३८० भा. दं. वि. | निर्दोष | निर्दोष सोडण्यात आले | काही नाही. |

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| सा. १ | वैशाली काशिराम खैरे | फिर्यादी/नि.क्र.१५ |

## आरोपी तर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## न्यायालयीन साक्षीदार

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## आरोपीतर्फे सिध्द करण्यात आलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## न्यायालयातर्फे निशाणी दिलेले दस्त

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## मुद्देमाल

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

आरोपींची प्रस्तुत खटल्याद्वारे भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ३८०, ४५४, ४५७ अन्वये संपरीक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, आरोपी फिर्यादीचा पुतण्या आहे. मौजे मारळ, बौध्दवाडी, श्रीवर्धन येथे फिर्यादीच्या मालकीचे राहते घर आहे. फिर्यादीने तिच्या घराच्या बांधकामाकरिता तिच्या घरात लोखंडी पाईप, शिगा अंदाजे २०० कि.ग्रॅ. वजन अंदाजे किंमत १०,०००/– असे साहित्य आणुन ठेवलेले होते.

३. दि.०२/०९/२०२३ ते ०५/०९/२०२३ या कालावधी दरम्यान फिर्यादी व तिच्या कुटुंबातील इसम मुंबईवरुन त्यांच्या सदरच्या घरात आले असता त्यांना त्यांच्या घरात सदरचे लोखंडी पाईप, शिगा सापडून आले नाही. त्यांनी शोध घेतल्यानंतर त्यांना खात्री झाली की, सदरचे लोखंडी पाईप, शिगा चोरीला गेले आहे. चोरी गेलेल्या पाईपबाबत त्यांनी गावातील लोकांकडे अधीक चौकशी केली असता त्यांना गावातील महिला नामे बेबी यांच्याकडून समजले की, ते घरात गैरहजर असताना आरोपी याने सदरचे पाईप घरातून नेले होते. आरोपीच्या सदरच्या कृत्याबाबत दि.१५/१०/२०२३ रोजी फिर्यादीने श्रीवर्धन पोलीस येथे आरोपीच्या विरुध्द फिर्याद दाखल केली होती. म्हणुन ही प्रस्तुतची फिर्याद.

४. सदर फिर्यादीआधारे श्रीवर्धन पोलीस ठाणेत गु. र. नं. १२४/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. श्री. श्रीकांत काळे, पोलीस उपनिरिक्षक यांनी केसचा तपास करून दोषारोपपत्र दाखल केले.

५. आरोपींविरुध्द नि.क्र.०८ वर भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये प्रतिकथन निश्चित केले. सदर प्रतिकथन आरोपीला वाचून व त्यांना त्यांच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपीने त्यास नकार देऊन संपरिक्षेची मागणी केली.

६. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ वैशाली काशिराम खैरे (फिर्यादी) यांची साक्ष निशाणी क्र.१५ वर नोंदवून घेतली आहे.

७. यातील फिर्यादी यांनी नि.१४ वर पुरसिस दाखल केलेली आहे. पुरसीस आधारे फिर्यादीने असे सांगीतले की, त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये तडजोड झालेली आहे. त्यांना आरोपींच्या विरोधात प्रकरण चालवायचे नाही. त्यांनी रागाच्या भरात फिर्याद दाखल केली होती. आज रोजी त्यांची कोणावरही कोणतेही तक्रार नाही. आरोपीचा गुन्हयाशी संबंध दर्शविणारा कोणताही पुरावा न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ खाली निवेदन नोंदविण्यात आले नाही.

८. अभियोग पक्षाचे कथन आणि पुरावा तसेच आरोपीच्या बचावाचा विचार करता पुढील विचाराधीन मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थित झाले असुन त्यावर माझे निष्कर्ष खालील कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक ०२/०९/२०२३ ते ०५/०९/२०२३ या कालावधी दरम्यान मौजे मारळ, बौध्दवाडी येथील फिर्यादीच्या राहत्या घरात आरोपीने चोरी करण्याच्या उद्देशाने फिर्यादीचे घराचे कुलूप तोडून घराच्या आत प्रवेश केला व त्याद्वारे आरोपीने भा.द.वि.चे कलम ४५७ सहकलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |
| २. | सदर कालावधीत व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीच्या घराचे कुलुप तोडून फिर्यादीच्या घरात चोरी करण्याच्या हेतूने स्वःचे अस्तित्व लपवून प्रवेश केला व त्याद्वारे आरोपीने भा.द.वि.चे कलम ४५४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३. | सदर कालावधीत व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीच्या घरातून २०० कि.ग्रॅ. लोखंडी पाईप अंदाजे किंमत १०,०००/- अशा वस्तु चोरी केल्या व त्याद्वारे आरोपीने भा.द.वि.चे कलम ३८० अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला हे अभियोगपक्ष सिद्ध करतो का ? | ... नाही. |
| ४. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **कारणमीमांसा** :

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता :-**

९. साक्षीदार क्र.१ हे सदर केसमधील फिर्यादी आहेत. त्यांनी नि.क्र.१४ कडे पुरसीस दाखल करुन सदर केस त्यांना चालवायची नाही व त्याची कोणत्याही व्यक्तीशी तक्रार नाही असे सांगीतले.

१०. साक्षीदार क्र.१ याने त्यांचे सरतपासामध्ये असे सांगीतले आहे की, दिनांक ०२/०९/२०२३ ते ०५/०९/२०२३ या कालावधी दरम्यान त्यांच्या घरात कोणतीही घटना घडलेली नव्हती. त्यांच्या घरातून लोखंडी पाईप, शिगा चोरीला गेले नव्हते. त्यांना त्यांच्या घरातील साहित्य मिळून येत नसल्याने नजरचुकीने त्यांनी तक्रार दाखल केलेली होती. त्यांना त्यांचे साहित्य मिळाले आहे. साक्षदार क्र.१ याने फिर्यादीमध्ये नमुद घटनाच नाकारलेली आहे. सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादी हे अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेने त्याचा उलटतपास घेतला असता सदर उलटतपासात देखील आरोपीविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणणेस अभियोगपक्ष अपयशी ठरला आहे. उलट फिर्यादीने त्यांची कोणाविरूध्द तक्रार नाही तसेच त्यांना केस चालवायचे नाही असे सांगीतले आहे. यावरुन फिर्यादी अभियोगपक्षास सहाय्य करीत नसलेचे दिसून येते.

११. सदर साक्षदारांच्या पुराव्यावरून फिर्यादी यास केस चालवायची नाही व त्याची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही असे दिसून येते व ही बाब सदर साक्षदारांनी त्याच्या उलटतपासात मान्य केली आहे. त्यामुळे आरोपीविरूद्ध सदर साक्षदार काहीही कथन करण्यास इच्छीत नाही असे स्पष्ट होते. फिर्यादीने घटना नाकारल्यामूळे आरोपीने फिर्यादीचे घरात शिरुन लोखंडी पाईप, शिगाची चोरी केली हे सिद्ध होत नाही. अभिलेखावर कोणताही तोंडी पुरावा आलेला नाही की, ज्या आधारे असे म्हणता येईल की, आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३८०, ४५४, ४५७ अन्वये खालील दंडनीय गुन्हा केला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी यांनी घटना नाकारल्यामुळे प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये समर्थणीय पुरावा म्हणजेच घटनास्थळ पंचनामा व जप्ती प्रमाणपत्र यांना काही मुल्य रहात नाही. सबब मुद्दा क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता** :-

१२. मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्षावरुन सर्व आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.४ करीता मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. आरोपी राहुल अरुण खैरे याची भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रियासंहिता१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामिन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/- ची जामीन दयावी.

४. जप्त मुद्देमाल लोखंडी पाईप, शिगा, शिगा अंदाजे वजन २०० कि.ग्रॅ. यापूर्वी

मुळ मालकास सुपूतनामा बंधपत्रावर परत दिली असल्यास त्याचा सुपूतनामा बंधपत्र अपील कालावधीनंतर रद्द होईल. जर परत दिली नसल्यास व सदर मुद्देमाल ०६ महिन्याच्या आत मागणी न केल्यास नियमाप्रमाणे जाहीर लिलाव करुन आलेली रक्कम सरकारी जमा करण्यात यावी.

५. सदर निकालाची प्रत जिल्हाधिकारी रायगड यांना पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

SAMEER KADER SHAIKH Digitally signed by SAMEER KADER SHAIKH Date: 2026.03.11 17:11:13 +0530

दि. ०९/०३/२०२६

**(एस. के. शेख)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन

**प्रमाणपत्र**

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, या पी.डी.एफ. फाईल न्यायनिर्णयातील आशय हा मूळ न्यायनिर्णयातील शब्दा शब्दा प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | श्री. एस. के. शेख प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड. |
| लघुलेखकाचे नाव | : | श्री. राहुल सुनिल मराठे (श्रेणी–३) |
| न्यायनिर्णयाची दिनांक | : | ०९/०३/२०२६ |
| पिठासिन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | : | ०९/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | : | ११/०३/२०२६ |